**ठळक बातम्या**

- देशात गरिबी आणि भूक निर्मूलन करणारी तसंच तरुणांना समान संधी देणारी धोरणं राबवून भारतानं जगासमोर वस्तुपाठ ठेवला असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आजही विविध कारणांवरून गदारोळ झाल्यानं दिवसभरासाठी कामकाज तहकूब

- माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा यांचं निधन

**आणि**

- मुंबईत बेस्ट बस अपघातातल्या मृतांची संख्या ७ वर, मृतांच्या कुटुंबांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर

**<><><><><>**

देशात गरिबी आणि भूक निर्मूलन करणारी तसंच तरुणांना समान संधी देणारी धोरणं राबवून भारतानं जगाला वस्तुपाठ घालून दिला आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्लीत विज्ञान भवन इथं आंतरराष्टीय मानवाधिकार दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या.

आज जागतिक मानवी हक्क दिन आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत १९४८ मध्ये मानवी हक्कांचा जाहीरनामा दहा डिसेंबरला प्रसिद्ध झाला होता. आपले हक्क, आपलं भविष्य, या क्षणी असं यंदाच्या मानवी हक्क दिनाचं ब्रीदवाक्य आहे.

मानवी हक्क दिनानिमित्त आकाशवाणीला दिलेल्या मुलाखतीत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष

न्यायमूर्ती बी. आर. गवई यांनी सांगितलं, की देशात या वर्षी राष्ट्रीय लोक अदालतींमध्ये सात कोटी सत्तर लाख प्रकरणं निकाली काढली गेली. देशात दर वर्षी तीन वेळा राष्ट्रीय लोक अदालती आयोजित केल्या जातात आणि अनेक वर्षांपासून थकीत असलेली प्रकरणं परस्पर सहमतीनं निकाली काढली जातात, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांचं रक्षण झालं तरच आपली लोकशाही बळकट होते, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केल आहे. आंतरराष्ट्रीय मानव हक्क दिनानिमित्त राज भवनातल्या दरबार हॉल इथं महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगानं आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. शाळा आणि महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांमध्ये मानवी हक्कांच्या शिक्षणाचा समावेश करून युवांमध्ये सहानुभूती आणि न्यायाची जाणीव निर्माण करणं गरजेचं असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

मुंबई उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती नरेश पाटील या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात राज्य मानवाधिकार आयोगाच्या स्मरणिकेचं प्रकाशन झालं. विविध दुर्लक्षित समाजघटकांच्या अधिकारांवर प्रकाश टाकणारी, सात मान्यवरांची सत्रंही या कार्यक्रमात झाली. तसंच महात्मा गांधींच्या ११ शपथांवर आधारित प्रदर्शन, तसंच मानवाधिकारांशी संबंधित विविध विषयांवरची दालनंही यावेळी लावण्यात आली होती.

या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या नाशिकच्या कमल लहारे यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं…

**बाइट- कमल लहारे (१६ सेकंद)**

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आजही विविध कारणांवरून गदारोळ होऊन आधी दुपारी बारा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी कामकाज तहकूब करण्यात आलं. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी विरोधकांच्या वागणुकीबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. सभागृहाच्या सभ्यतेचे पालन केलं जावं, तसंच देशातल्या जनतेच्या आशा आकांक्षांचा आदर राखत काम केलं जावं, असं आवाहन त्यांनी विरोधी नेत्यांना केलं.

राज्यसभेतही असंच चित्र दिसून आलं. आम आदमी पार्टीचे खासदार संजय सिंग यांनी दिल्लीतल्या कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित केला. यावर सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात खडाजंगी झाल्यानं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी कामकाज तहकूब केल्याचं जाहीर केलं.

<><><><>

राज्यसभेत अध्यक्ष जगदीप धनखड यांच्याविरुद्ध काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीनं अविश्वास ठराव मांडला आहे. विरोधी पक्षांच्या सदस्यांना सभागृहात बोलण्याची संधी नाकारुन पक्षपात करत असल्याचा आरोप करत विरोधकांनी हा प्रस्ताव मांडला असल्याचं काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी ट्विटरवर म्हटलं आहे. लोकशाहीच्या रक्षणार्थ नाईलाजाने विरोधी आघाडीला हा निर्णय घ्यावा लागल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

यूपीएससी अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२४ चा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत निवड झालेले  उमेदवार आता भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय परदेश सेवा, भारतीय पोलीस सेवा आणि इतर सेवांमध्ये निवड होण्यासाठी व्यक्तिमत्त्व चाचणी मुलाखतीला सामोरे जातील. या मुलाखतीच्या तारखा नंतर जाहीर करण्यात येतील. हा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

<><><><><>

माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा यांचं आज पहाटे बेंगळुरू इथे त्यांच्या निवासस्थानी निधन झालं. ते ९२ वर्षांचे होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना काही दिवसांपूर्वी बेंगळुरू इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. रुग्णालयातून घरी आल्यानंतर पुन्हा त्यांची प्रकृती खालावली आणि आज पहाटे त्यांचं निधन झालं. एस. एम. कृष्णा यांनी आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीत अनेक महत्त्वाची पदं भूषवली. १९९९ ते २००४ या काळात ते कर्नाटकचे मुख्यमंत्री होते. तर केंद्रात २००९ ते २०१२ पर्यंत परराष्ट्र मंत्री म्हणून त्यांनी काम केलं होतं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कृष्णा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. कृष्णा हे अनुभवी संसदपटू होते. त्यांनी राज्यपाल पदाची प्रतिष्ठा कायम जपली. त्यांच्या निधनामुळे देशानं राजकारणातलं एक सुसंस्कृत आणि अभिरुचीसंपन्न व्यक्तिमत्त्वं गमावलं असल्याची भावना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजीत पवार, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही कृष्णा यांच्या निधनाबद्दल दुःख व्यकत केलं आहे.

<><><><><>

मुंबईत कुर्ला इथं बेस्ट बसच्या अपघातातील मृतांची संख्या सातवर पोहचली आहे. तर, जखमींची संख्या ४९ झाली आहे. जखमींना उपचारासाठी मुंबईतील विविध रूग्णालयांमधे दाखल केलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. तसंच, मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाख रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे. अपघातातल्या जखमींच्या उपचाराचा खर्च मुंबई महापालिका आणि बेस्टच्या वतीनं करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

दरम्यान, या बसच्या चालकाला न्यायालयानं २१ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

<><><><><>

सातव्या स्मार्ट इंडिया  हॅकेथॉनची अंतिम फेरी उद्या देशभरातल्या ५१ केंद्रांवर होणार असून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान त्याचं उदघाटन करतील. सुमारे तेराशे विद्यार्थी यात सहभागी होणार आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या या विद्यार्थ्यांशी संवाद साधणार असून त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. यंदाच्या हॅकेथॉनमध्ये संस्था स्तरावर दीडशे टक्के वाढ नोंदवली गेली आहे.

नागपूरमधे हिंगणा इथल्या जी एच रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयातही ही फेरी उद्या होणार  आहे. विविध राज्यातून आलेले  विद्यार्थ्यांचे २० चमू  केंद्रीय सूक्ष्म,  लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या प्रॉब्लेम स्टेटमेंट वर सॉफ्टवेअर विकसित करणार आहेत.

<><><><><>

बांगलादेशात अल्पसंख्याक असणाऱ्या हिंदू समुदायावर अत्याचारांच्या घटनांचा निषेध करण्यासाठी आज राज्यभरात विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आलं. बांगलादेश सरकारने अत्याचाराविरोधात कठोर पावलं उचलावीत आणि हिंदू धर्मगुरूंची सुटका करावी, असा आग्रह भारत सरकारने करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

**नाशिक**मध्ये विविध संघटनांनी काढलेल्या मोर्चात मोठ्या प्रमाणात नागरिक सहभागी झाले होते. **धुळे** शहरात सकल हिंदू समाजाच्या वतीने मूक मोर्चा काढण्यात आला. **सोलापुरात** अनेक हिंदुत्ववादी संघटनांनी एकत्र येत मोर्चा काढला. यावेळी बांगलादेशाचा ध्वज जाळून निषेध करण्यात आला. **रत्नागिरी**त विश्व हिंदू परिषदेने मोर्चा काढला होता. यात आमदार उदय सामंत आणि किरण

सामंत सहभागी झाले होते. **विदर्भात** गोंदिया आणि अकोला इथंही जन आक्रोश रॅली काढण्यात आली. यावेळी बांगलादेशाविरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

**मराठवाड्यात** धाराशिवमध्ये सकल समाजाच्या वतीने निदर्शनं करण्यात आली. हिंगोलीत गांधी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. नांदेड, परभणी आणि जालना शहरातही जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून बांगलादेशातल्या हिंदूवरील अत्याचाराचा निषेध करण्यात आला.

**<><><><><>**

वंचित बहुजन आघाडीचे उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष विकास उर्फ अण्णा जाधव यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यात सहभागी असलेल्या दोन आरोपींना रत्नागिरी पोलिसांनी बदलापूरमधून अटक केली. त्यांना गुहागरच्या न्यायालयानं १२ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या दोन दिवस आधी जाधव यांच्यावर गुहागरमध्ये हल्ला झाला होता. आणखी पाच आरोपींचा या गुन्ह्यात सहभाग असल्याचं निष्पन्न झालं असून, त्यांचा कसून शोध सुरू आहे.

**<><><><><>**

राज्यात गेल्या चोवीस तासात, तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली. सर्वात कमी किमान तापमान जळगाव इथं आठ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहिल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**